**<u>नि.दि.मु.क्र. ११९/२०१७ मधील नि. १७ वरील आदेश</u>**

१. अर्ज वाचला. वादीकरीता ॲड. एस. एस. माने यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही त्यामुळे गुणवत्तेवर हा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२. मौजे भुईंज तालुका वाई येथील सिटी सर्व्हे क्र. ७२६, ७२७, ७२८ व ७२९ मध्ये असणारे पुर्व—पश्चिम व दक्षिण—उत्तर दिशेतील समाईक बोळ मध्ये प्रतिवादींनी पुर्व—पश्चिम व दक्षिण—उत्तर अतिक्रमण करुन बांधकाम केलेल्या जागेची न्यायालयीन आयोगा मार्फत मोजणी होवुन तसा अहवाल सादर होणे बाबत वादीने दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे हा अर्ज दाखल केला आहे.

३. वर नमुद मिळकती बाबत वादीचे ताब्यास प्रतिवादींनी अडथळा निर्माण करु नये म्हणुन निरंतर मनाई हूकूम आदेश पारीत करणे करीता तसेच वाद बोळामध्ये प्रतिवादींनी केलेले बांधकाम काढुन बोळ पुर्ववत करुन देणे बाबत अनिवार्य मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता वादीने हा दावा दाखल केला आहे.

४. दाव्याचे व दाव्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा अतिक्रमण काढुन मिळणे करीता व त्या बाबत अनिवार्य मनाई हुकूम आदेश पारीत होणे करीता दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी निश्चित किती प्रमाणात अतिक्रमण केले आहे ही बाब अभिलेखावर येणे गरजेचे आहे व त्या करीता न्यायालयीन आयोग नेमणे गरजेचे आहे. सदरचे काम तज्ञ न्यायालयीन आयोगामार्फत होणे गरजेचे आहे. त्यामुळे उप अधिक्षक भुमी अभिलेख यांना त्या करीता न्यायालयीन आयोग म्हणुन नेमणुक करणे न्यायोचित होईल, असे माझे मत आहे. सबब त्यामुळे हा अर्ज मंजुर करणे उचित होईल त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

नि.दि.मु.क्र. ११९/२०१७
मुकूंद वि. मदन व इतर
नि. १७

## :: आ दे श ::

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, वाई यांना न्यायालयीन आयोग म्हणुन नेमण्यात येत आहे व त्यांना निर्देशित करण्यात येते की, भुईंज तालुका वाई येथील सिटी सर्व्हे क्र. ७२६, ७२७, ७२८ व ७२९ मध्ये असणारे पुर्व—पश्चिम व दक्षिण—उत्तर दिशेतील समाईक बोळ मध्ये प्रतिवादींनी पुर्व—पश्चिम व दक्षिण—उत्तर जागेत केलेल्या तथाकथित अतिक्रमीत जागेची मोजणी करुन त्या बाबत अहवाल दाखल करण्यात यावा.

३. वाद जागेचे मोजणी बाबत वादीने संबंधित कार्यालयात योग्य ते शुल्क भरावे.

४. या न्यायालयाचे संबंधित लिपीक यांना निर्देशित करण्यात येत आहे की, या आदेशाची रिट संबंधित कार्यालयास पाठविण्यात यावी.

५. उप अधिक्षक भुमी अभिलेख, वाई यांना निर्देशित करण्यात येत आहे की, वादीने मोजणी बाबत योग्य ते शुल्क भरलेवर त्या तारखेपासुन दोन महिन्यांचे आत जागेची मोजणी करुन तसा अहवाल या न्यायालयात सादर करण्यात यावा.

ठिकाण : वाई. (व्ही. एन. गिरवलकर)
दिनांक : १७.०८.२०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.